पुणे महानगरपालिका

* क्रीडा समिती *

कार्यपत्रिका क्र. ७

<u>क्रीडा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दि.२७/७/२०१७ सकाळी ११:३०(अकरा तीस) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरेल.</u>

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

<u>विषय क्र.१७</u>

मा.योगेश ससाणे ,मा.महेंद्र पठारे व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि.१७/७/२०१७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने कोट्यावधी रुपयांच्या निधीतून कै.रामचंद्र अप्पा बनकर शाळा गोंधळेनगर ,या शाळेत ग्रंथालय,सायन्य लॅब,संगणक लॅब,संगित रूम,ॲडोटोरियम,जीम,बॅडमिंटन हॉल,स्नुकर हॉल,स्विमिंग टॅक,टेबल टेनिस,आर्चरी इत्यादी स्पोर्टस ऑक्टिव्हिटी व सुसज्ज अशी इमारत बांधून तयार आहे. हडपसर बीट मध्ये मनपाच्या सुमारे २७ शाळा असून सुमारे १०,९०० विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यापैकी कित्येक शाळांना साधे खेळाचे मैदान उपलब्ध नाही. यामुळे हडपसर बीट व पुणे शहरातीली हजारो विद्यार्थ्यांना सदर संकुलातील सर्व स्पोर्टस ॲक्टिव्हिटी मोफत उपलब्ध करून दिल्यास मनपातील विद्यार्थ्यांना मिळेल. यामध्ये व्यावसायिक दृष्टीकोन बाजूला ठेवून मनपाच्या शाळांतील विद्यार्थ्याच्या भविष्याचा विचार करावा.

<u>विषय क्र.१८</u>

मा.सौ.श्वेता गलांडे–खोसे व मा.ॲड्.गायत्री खडके,अध्यक्ष,विधी समिती यांचे दि.२१/७/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३ विमाननगर येथील स्केटींग रिंग मधील उर्वरित जागेमध्ये साहसी खेळ Wall Climbing ची भिंत उभारणे व ट्रेनिंग सेंटर सुरु करण्यात यावे.

<u>विषय क्र.१९</u>

मा.सौ.श्वेता गलांडे–खोसे व मा.ॲड्.गायत्री खडके,अध्यक्ष,विधी समिती यांचे दि.२१/७/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३ रामवाडी पुणे म.न.पा.चे विद्यालय सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर विद्यालय येथील बास्केटबॉल कोर्टचे रिंक व त्यामागील बोर्ड इंटरनॅशनल दर्जाचे बसविण्यात यावेत.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.